**ई-निविदा प्रणाली (ई-टेंडरींग)च्या**
**प्रभावी अंमलबजावणीकरीता**
**मार्गदर्शक सूचना**

# कार्यालय नगर परिषद रामटेक

## जिल्हा-नागपूर ४४११०६

परिपत्रक क्र. नपरा/ई-गव्ह/ई-निविदा /685 /2019

दिनांक 07/08/2019

**कार्यालयीन परिपत्रक**

महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाचे शासन निर्णय दि. 26 नोव्हे. 2014 नुसार 3 लाखांपेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणाली वापरायची असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाने www.mahatenders.gov.in हे पोर्टल निश्चित केलेले आहे. त्यानुसार न.प. कार्यालयात ई-निविदा प्रणालीचा वापर सुरु आहे. ई-निविदा प्रणालीचा वापर करताना सर्व विभाग प्रमुखांनी खालील पद्धतीचा अवलंब करावा.

**1)** ई-निविदेसाठी खालील नमूद कागदपत्रे योग्य त्या स्वरूपात तयार करावेत.

| | | |
|---|---|---|
| 1) NIT Document | - | PDF स्वरूपात |
| 2) Tender Document | - | PDF स्वरूपात |
| 3) BOQ | - | EXCEL स्वरूपात |

खालील बाबी NIT /Tender Doc मध्ये नमूद असणे अथवा अधिकृत रित्या लिखित स्वरूपात असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) Bid Validity | - | दिवसांत ( उदा. 90 दिवस/120 दिवस ) |
| 2) Tender Type | - | Works/Service/Goods त्यादी |
| 3) कामाचा कालावधी | - | दिवसांत ( उदा. 15 दिवस) |

**2)** आधी निविदा शासनाचे पोर्टल वर अपलोड करणे आवश्यक आहे. निविदा अपलोड झाल्यानंतर त्याची माहिती (summary) PDF स्वरूपात प्राप्त करूण ते निविदा समितीने तपासणे आवश्यक आहे व ते बरोबर असल्याची खात्री पटल्यानंतरच ते पोर्टल वर व वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. ( First we have to upload tender documents on portal correctly and after that publish it on online portal as well as in newspaper). आधी वर्तमानपत्रात प्रसिद्धीसाठी व त्यानंतर शासनाचे पोर्टलवर अपलोड करणेविषयी कार्यवाही असे होता कामा नये.

**3)** निविदा सादर करावयाची अंतिम तारिख व वेळ (Bid submission Last date and time) निविदा उघडण्याची वेळ (Bid opening date and time) यादरम्यान **किमान 24 तासांचा अवधी असणे बंधनकारक** आहे.

4) निविदा सादर करावयाची मुदत संपल्यानंतर तथापि निविदा उघडण्याच्या वेळेपूर्वी **"किती निविदा प्राप्त झाल्यात (**Number of bids submitted) **"** याची माहिती पोर्टलवरूण प्राप्त होते. तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास 24 तासांचे आत मुदतवाढ देता येणे शक्य असते. निविदा उघडण्याचे दिवसानंतर मात्र ही सुविधा उपलब्ध

नसते. त्यामुळे **retender** करावे लागते. सबब **Number of bids submitted**? ही माहिती प्राप्त करणे ही सबंधित विभागप्रमुखांची जबाबदारी राहिल जेणे करूण पुढील कार्यवाहीसाठी निर्णय घेणे सोईचे होईल.

5) निविदा शुद्धीपत्रक (Date Extension/Cancellation/etc) प्रकाशित करावयाचे असल्यास PDF स्वरूपात शुद्धीपत्रक तयार करावेत व संकेतस्थळावर अपलोड करावेत.

**5)** निविदा पुनर्प्रसिद्धी ( उदा . दुसरी वेळ , तिसरी वेळ ) करताना खालील नमूद कागदपत्रे योग्य त्या स्वरूपात तयार करावेत.

1) Corrigendum letter - PDF स्वरूपात
2) NIT Document - PDF स्वरूपात
3) Tender Document - PDF स्वरूपात
4) BOQ - EXCEL स्वरूपात

**6)** संकेतस्थळावर निविदा प्रक्रिया पूर्ण करणेसाठी खालीलप्रमाणे पाच टप्पे आहेत.

**1.** Technical Opening **--** तांत्रिक लिफाफा उघडणे
2. Technical Evaluation -- तांत्रिक मुल्यमापन
3. Financial Opening -- वित्तीय लिफाफा उघडणे
4. Financial Evaluation -- वित्तीय मुल्यमापन
5. AOC (Award of Contract) -- कार्यादेश

**7)** तांत्रिक/ वित्तीय बोली मंजूर झाल्यास तशी अधिकृत कागदपत्रे निविदा समिती/ मुख्याधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी **Technical/Financial Evaluation** साठी **PDF** स्वरूपात अपलोड करणे आवश्यक आहे.

**8)** निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कामाचे कार्यादेश (**AOC**) पोर्टल वर अपलोड केल्यानंतरच सबंधित कंत्राटदारास निर्गमित करावे. ही सबंधित विभागप्रमुखांची जबाबदारी राहिल.

**9)** ई-निविदा सबंधी निविदा समितीचा औपचारीक सदस्य म्हणून संगणक अभियंता हे सबंधित विभागप्रमुखास निविदा प्रसिद्धी, ऑनलाईन खाते उघडणे/लॉगिन करणे, सबंधित विभागप्रमुखांच्या परवानगीने व उपस्थितीत त्याचा वापर करणे, त्यांचे अभिप्रायानुसार ऑनलाईन निविदा प्रक्रिया राबविण्यात तांत्रिक मदत करतील. संगणक अभियंता यांना केवळ तांत्रिक मदत करावयाची असून निविदे सबंधी सर्व प्रत्यक्ष निर्णय सबंधित विभाग प्रमुख यांनीच घ्यावयाचे आहेत याची नोंद घ्यावी.

**(स्वरूप खारगे)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद रामटेक**